# सृष्टिज्ञान : ५० वर्षांपूर्वी

## (एप्रिल-मे १९७३, वर्ष ४६वे, अंक ४-५, क्रमांक ५४४-५४५)

पन्नास वर्षापूर्वीचा एप्रिल–मे जोड अंक होता, त्यात १२ लेख होते ज्यापैकी पहिले पाच आपण एप्रिल २०२३ चे अंकात पाहिले. आता लेख क्र. ६ ते १२ पाहुया. सहावा लेख वाचकांचा पत्रव्यवहार व सिंह–वाघ यांच्या संकरावर आधारीत आहे. वाचकांच्या पत्रव्यवहारात आता गणितानंद म्हणून प्रसिद्ध असलेले जागतिक कीर्तिचे गणितज्ञ कै. द. रा. कापरेकर यांचे पत्र आहे. त्यांनी काही कुतुहलात्मक प्रश्न विचारले असून पुढील अंकात त्यांची उत्तरे मिळावित अशी अपेक्षा केली आहे. तर अन्य परव्यवहार कोपर्निकसच्या ग्रंथासंबंधी आहे.

श्री. एम. बी. मुळे यांचा ‘गुंडोपंत गाडी गांठतात’ या लेखात गणितातील क्रिटिकल पाय मेथड ही संकल्पना सोप्या भाषेत समजावली आहे. एका ठराविक वेळेची गाड़ी गांठतांना गुडोपंत कुटुंबियांना त्यांच्या दैनंदिन कार्यक्रमाची आदर्श अशी पुनर्रचना कशी करावी लागेल हे उदाहरणासहीत दिले आहे.

मानाचा मुजरा हा वैज्ञानिकांविषयी कृतज्ञता व्यक्त करणारा लेख प्रा. प्र. वि. सोवनी यांनी लिहिला आहे. त्यात विल्यम हार्वे, ख्रिश्चन हॉयगेन्स, मॅक्स प्लॅन्क व लिओनार्डो द वीन्सी यांच्या संशोधनांची संक्षिप्त माहिती आहे. श्री. प्र. अ. केसकर यांनी लिहिलेला ‘आकड्यांचा आणखी खेळ’ यातील तीन अंकी संख्यांचा वर्ग करण्याची नवी पद्धत दिली आहे. ही पद्धत ट्रॅक्टनबर्ग या गणितज्ञाने विकसित केली आहे. मंदबुद्धीच्या विद्यार्थ्यांना गणित नव्या पद्धतीने शिकवून त्यांच्याकडूनही उत्तम कामगिरी करून घेण्यात ट्रॅक्टनबर्ग पटाईत होता. प्रा. शं. म. परांडेकर यांनी मका या धान्याविषयी सखोल माहिती दिली आहे. या वनस्पतीचा उपयोग करून गेल्या काही वर्षात अनेक संकरण पद्धती विकसित केल्या आहेत. याचा मुद्दाम उल्लेख केला आहे. आज आपण जीनेटिकली मॉडिफाईड फूड (GMF) म्हणून जे तंत्रज्ञान ओळखतो त्याचा प्रारंभीचा काळ म्हणजे मक्यावर झालेले संशोधन.

डॉ. श्री. र. आपटे यांचा ‘आरोग्या शास्त्राचे आद्यप्रणेते भगवान धन्वंतरी’ या लेखात आरोग्य रक्षणाचा प्रवर्तक व देवांचा वैद्यराज धन्वंतरी यांची माहिती आहे. प्रा. गो. रा. परांजपे यांचा कै. प्रा. नारायण हरी आपटे यांना श्रद्धांजली अर्पण करणारा लेख आहे.

◆

**विज्ञान वार्ताहर**